# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे

## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

फोन नं.(०२०) २६०५०६४१ ई-मेल आयडी :- sceapune@gmail.com

जा.क्र.रासनिप्रा/ड वर्ग सं.कृ.का./प्रा.अ./मान्यता/२०१४/618
दिनांक 30/10/२०१४

प्रति,
जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था नंदुरबार

**विषय : 'ड' वर्गातील सहकारी संस्थांच्या निवडणुकीसाठी निवडणुक निर्णय अधिकारी/ प्राधिकृत अधिकारी यांची नेमणुक व त्यांचे कृती कार्यक्रमाबाबत...**

**संदर्भ :** आपले कार्यालयीन प्रस्ताव जा.क्र.युआर वी-२/ निवडणुक/कार्य/ड वर्ग/२०१४ दि.२९/१०/२०१४

उपरोक्त संदर्भांकीत विषयाकडे आपले लक्ष वेधण्यात येऊन कळविणेत येते की,

२/- संदर्भीय प्रस्तावाव्दारे आपण जळगाव जिल्ह्यातील ५ तालुक्यातील 'ड' वर्गामधील दि. ३१/१०/२०१४ अखेर निवडणुकीस पात्र असलेल्या एकुण १६ सहकारी संस्थाच्या निवडणुकीबाबतच्या कृती कार्यक्रमास मंजुरी मिळणेस्तव या कार्यालयास विनंती केलेली आहे.

'ड' वर्गातील सहकारी संस्थांचे निवडणुका ह्या महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम ७६, महाराष्ट सहकारी संस्था नियम, १९६१ चा नियम ६० मधील तरतुदी अंतर्गत व महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) २०१४ मधील नियम ७६ नुसार तसेच संस्थेचे मंजुर उपविधीप्रमाणे पार पाडणे आवश्यक आहे.

सबब त्यास अनुसरुन उपरोक्त संदर्भीय प्रस्तावात नमुद आपल्या जिल्ह्यातील दि.३१/१०/२०१४ अखेर निवडणुकीस पात्र 'ड' वर्गातील एकुण १५ संस्थांचा प्राधिकृत अधिकारी नियुक्तीच्या प्रस्तावात शिफारस केल्याप्रमाणे खालील शर्तीस अधिन राहुन सोबत जोडलेल्या **परिशिष्ट अ** मधील त्या त्या संस्थांच्या नावासमोर दर्शविलेल्या व्यक्तिंना प्राधिकृत अधिकारी म्हणुन नियुक्त करण्यात येत आहे. **तसेच उक्त नियुक्त अधिकारी यांनाच त्या त्या संस्थांच्या नियम ७७ नुसार पदाधिकारी निवडीच्या सभेसही प्राधिकृत अधिकारी म्हणुन नियुक्त करण्यात येत आहे.**

१. प्रस्तावात नमुद केलेल्या संस्थांचा प्रस्तावित विशेष साधारण सभेची नोटीस काढण्याचा दिनांक व सभेचा दिनांक यामध्ये नियम ७६ मधील तरतुदीप्रमाणे १५ दिवसांची मुदत असेल याची दक्षता घ्यावी.
२. संस्थेच्या अधिमंडळाच्या विशेष बैठकीचा दिनांक १/११/२०१४ नंतरचा असावा.
३. गृहनिर्माण सहकारी संस्थांचे अधिमंडळाचे विशेष बैठकीचा दिनांक शक्यतो रविवार असावा.
४. प्राधिकरणाचे दि.१८/१०/२०१४ रोजीचे 'ड' वर्ग संस्थांचे निवडणुकीबाबतचे सर्वसाधारणपर मार्गदर्शन सुचना तालुका सहकारी निवडणुक अधिकारी/ जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी यांनी संबंधित प्राधिकृत अधिकाऱ्यास अवगत कराव्यात.

५. 'ड' वर्गात समाविष्ट नसलेल्या संस्थांच्या निवडणुकीकरता प्राधिकृत अधिकारी नेमता येणार नाहीत असे झाले नाही याची खात्री तालुका सहकारी निवडणूक अधिकाऱ्याने प्राधिकृत अधिकारी यांना अवगत करणेपुर्वीच करावी.

६. प्रमाणित लेखापरीक्षक ज्यांची प्राधिकृत अधिकारी म्हणुन नावे सुचविली आहेत ते नामतालिकेवर असल्याची पुन:श्च खात्री प्राधिकृत अधिकाऱ्याला अवगत करणे पुर्वीच करावी.

**सदरचे नियुक्ती आदेश मा. आयुक्त, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मान्यतेने व निर्देशाप्रमाणे निर्गमित करण्यात येत आहे.**

30/10/14

**(डॉ. आनंद जोगदंड)**
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

(राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे)

**प्रत :** माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव संबंधित तालुका सहकारी निवडणूक अधिकारी

## परिशिष्ट अ

राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाकडील कार्यालयीन पत्र जा.क्र.रासनिप्रा/ड वर्ग सं.कृ.का./प्रा.अ./मान्यता/२०१४ दि.३०/१० /२०१४ चे आदेशासोबतचे परिशिष्ट

| जिल्हा | तालुक्याचे नाव | अ.क्र. | संस्थेचे नाव | विशेष साधारण सभेचे प्राधिकृत अधिकाऱ्याचे नाव व हुद्दा |
|---|---|---|---|---|
| नंदूरबार | नवापूर | १ | रायपूर जंगल कामगार सह.सो.लि. ता.नवापूर | श्री.बी.बी. अहिरे, मु.लि. नवापुर |
| | शहादा | २ | फेस पाणी पुरवठा सहकारी संस्था म फेस, ता. शहादा | श्री.जी.एच. बागल सह.अधिकारी व्दि.श्रे. |
| | नंदूरबार | ३ | प्राथमिक शिक्षकांची सहकारी गृहनिर्माण संस्था म. नंदुरबार | श्री.एस व्ही बोरसे सह. अधि.(२) नंदुरबार |
| | | ४ | यशवंतराव चव्हाण मध्यमवर्गीय सह.गृह निर्माण संस्था म .नंदूरबार | श्री.दि.गु.गायकवाड सह.अधिकारी प्र. श्रे, |
| | | ५ | दत्तात्रय मजूर सह संस्था म.भालेर | श्री.मो.द. गांगुर्डे सहा.सह. अधि. नंदुरबार |
| | तळोदा | ६ | गणेश मजुर सह. संस्था मर्यादित तळोदा ता.तळोदा जि. नंदूरबार | श्री.बी.बी. देवरे, सह.अधि., प्र. श्रे, तळोदा |
| | | ७ | मनोकिरण मजुर सह. संस्था मर्यादित भवर मु.पो.भवर ता. तळोदा जि.नंदूरबार | |
| | | ८ | प्रशांत मजुर सह. संस्था मर्यादित , चिनोदा ता.तळोदा जि. नंदूरबार | श्री. वि.दे. सामुद्रे मुख्य लिपिक तळोदा |
| | अकलकुवा | ९ | राजापांठा सहकारी पाणलोट व्यवस्थापन व पाणी वापरसंस्था मर्या.महुखाडी ता.अ.कुव | श्री.के.एफ. घोलप सह. अधि.(प्र.श्रे) |
| | | १० | जय योगेशवर सह. पाणलोट व्यवस्थापन व पाणी वापर संस्था मर्या.खडकुणा ता.अ.कुवा | श्री.ए.एन.पाटील,सहा.सह.अधि.अ.कुवा सहा.सह. अधि. |
| | | ११ | श्रीनाथ मजुर सहकारी संस्था मर्यादित वाण्याविहीर ता.अ.कुवा | श्री.के.एफ. घोलप सह. अधि.(प्र.श्रे) |
| | | १२ | श्री.विनायक मजुर सहकारी संस्था मर्यादित अक्कलकुवा | श्री.ए.एन.पाटील,सहा.सह.अधि. अ.कुवा |
| | | १३ | राहुल मजुर सहकारी संस्था मयादित अक्कलकुवा | श्री.के.एफ. घोलप सह. अधि.(प्र.श्रे) |
| | | १४ | दुर्गेश मजुर सहकारी संस्था मर्यादित महुखाडी ता.अ.कुवा | श्री.ए.एन.पाटील,सहा.सह.अधि. अ.कुवा |
| | | १५ | श्री.गणेश मजुर सहकारी संस्था मर्यादित शेल्टापाणीता.अ.कुवा | श्री.के.एफ. घोलप सह. अधि.(प्र.श्रे) |
| | | १६ | मागसवर्गीय मजुर सहकारी संस्था मर्यादित राजमोहीता.अ.कुवा | श्री.ए.एन.पाटील,सहा.सह.अधि. अ.कुवा |

३०/१०/१४

(डॉ. आनंद जोगदंड)
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य,पुणे.

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे